**"ई-चावडी" व "ई-फेरफार" या योजनेअंतर्गत संगणकावरुन देण्यात येणा-या ७/१२ उताऱ्यांच्या प्रतींवर आकारण्यात येणाऱ्या शुल्काबाबत.**

## महाराष्ट्र शासन

### महसूल व वन विभाग

**शासन निर्णय क्रमांकः** योजना-२०१३/प्र.क्र.९३/ई-१०

३२ वा मजला, सेंटर १ इमारत, जागतिक व्यापार केंद्र,

कफ परेड, मुंबई-४०० ००५

दिनांक: १८ मार्च, २०१४

<u>वाचा :-</u>

1. **शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. संकिर्ण-२०११/ (प्र.क्र.१७८/ ११)/ ई-१०, दि.१६.११.२०११.**
2. **नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचेपत्र क्र. डीएपी-१०१३/प्र.क्र.४४९/कार्यासन १४८१, दि.२३.१०.२०१३.**

<u>**प्रस्तावना :-**</u>

"ई-चावडी" यांजनेअंतर्गत संगणकावरून देण्यात येणाऱ्या ७/१२ उताऱ्याच्या प्रतींवर आकारण्यात येणाऱ्या शुल्काबाबत संदर्भाधिन दि.१६.११.२०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये जमीनीच्या ७/१२ उतऱ्याच्या प्रती संगणकावरून वितरीत करतांना आकारावयाच्या शासन शुल्कासंदर्भात आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. "ई-चावडी" व "ई-फेरफार" या योजनेअंतर्गत संगणक खरेदी न केलेल्या तलाठयासाठी जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत राबविण्यात येणा-या नाविन्यपूर्ण योजनेअंतर्गत संगणक प्रिंटरसह खरेदी करून उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. त्यामुळे प्रति ७/१२ उताऱ्यास आकारावयाच्या रकमेसंदर्भात नव्याने निर्णय घेण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता. यानुसार संदर्भाधिन दि.१६.११.२०११ रोजीचा शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येऊन, आता पुढीलप्रमाणे सुधारीत शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय:-**

राज्यातील "ई-चावडी" व "ई-फेरफार" या योजनेअंतर्गत ज्या तलाठ्यांनी संगणक व प्रिंटर खरेदी केलेले आहेत, त्यांनी जमीनीच्या ७/१२ उतऱ्याच्या प्रती संगणकावरून वितरीत करतांना प्रति ७/१२ उताऱ्यास, प्रत्येकी रु.१५/- (रुपये पंधरा फक्त) इतकी रक्कम, शुल्क म्हणून संबंधितांस आकारावी. सदर रक्कमेतील रु.५/- (रुपये पाच फक्त) या प्रमाणे जमा होणारी रक्कम शासन हिस्सा म्हणून जिल्हाधिकारी यांचे नावे असलेल्या लेखाशिर्षखाली दरमहा जमा करावी. उर्वरित रक्कम रू.१०/- संबंधित तलाठयांनी स्वत:कडे ठेवावे. यानुसार रुपये १०/- याप्रमाणे जमा होणाऱ्या एकूण रक्कमेतून संबंधित तलाठयांनी

संगणक व प्रिंटरची देखभाल/ दुरुस्ती व विजेवरील खर्च इ. सर्व खर्च करावा व त्याचा स्वतंत्र हिशोब ठेवावा.

ज्या तलाठ्यांनी “ई-चावडी” व “ई-फेरफार” प्रकल्पाअंतर्गत संगणक खरेदी केलेले नाहीत त्या तलाठ्यांसाठी, जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत राबविण्यात येणा-या नाविन्यपूर्ण योजनेतून, संगणक प्रिंटरसह खरेदी करून उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. अशा तलाठ्यांनी जमीनीच्या ७/१२ उताऱ्याच्या प्रती संगणकावरुन वितरीत करतांना, प्रति ७/१२ उताऱ्यास, प्रत्येकी रु.१५/- (रुपये पंधरा फक्त) इतकी रक्कम शुल्क म्हणून संबंधितांस आकारावी. सदर शुल्कातून जमा होणारी सर्व रक्कम (रु.१५/-) शासन हिस्सा म्हणून लेखाशिर्ष **“००२९-जमीन महसूल, ५०१ सेवा व सेवा फी (०१) केलेल्या सेवांकरीता प्रदानाची वसुली”** या लेखाशिर्षाखाली आयुक्त निहाय (संगणक संकेतकामध्ये) उपशीर्षामध्ये दरमहा जमा करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०३१९१२२४३६५७१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Swadheen S Kshatriya

Digitally signed by Swadheen S Kshatriya
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Swadheen S Kshatriya
Date: 2014.03.19 14:16:55 +05'30'

**(स्वाधिन क्षत्रिय)**

**अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव यांना माहितीसाठी अग्रेषित.
२. मा. राज्य मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव यांना माहितीसाठी अग्रेषित.
३. अप्पर मुख्य सचिव (महसूल) यांचे विशेष कार्य अधिकारी यांना माहितीसाठी अग्रेषित.
४. प्रधान सचिव (नियोजन) यांचे खाजगी सचिव यांना माहितीसाठी अग्रेषित.
५. सर्व विभागीय आयुक्त
६. सर्व जिल्हाधिकारी
७. सर्व सहायक जिल्हाधिकारी
८. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
९. सर्व लेखा व कोषागार कार्यालय.